५/२/२०२५

# दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**भाऊसाहेबनगर।** भाऊसाहेब नगर विद्याभवनात इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर जगताप व प्रमुख व्याख्याते पुरुषोत्तम ज्यु. कॉलेजचे नाशिकचे मराठी प्राध्यापक सुनिल हिंगणे होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमा पूजन करुन करण्यात आली. पाहुण्यांचा परिचय गाडे यांनी केले तर प्राचार्यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमात इ. १० वी तील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्याभवनाच्या पर्यवेक्षिका सौ. उल्का कुरणे, बी.डी. मोंढे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे हिंगणे यांनी दहावी परिक्षेस जातांना करावयाची तयारी व अभ्यासाचे नियोजन याविषयी मार्गदर्शन केले. मा. प्राचार्यांनी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संजय धनगर यांनी केले तर आभार डी.एम. देवकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.